## महाराष्ट्र शासन

<u>महत्वाचे</u>

क्रमांकःएचएससी-१७११/(२७३/११)/उमाशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५ जून, २०११

प्रति,
शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.),
महाराष्ट्र राज्य,पुणे.

विषयः- सी.बी.एस.ई.मंडळाशी संलग्न असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या इ.११ वी प्रवेशाबाबत

संदर्भः- आपले पत्र क्र एचएससी-२०१०/११ वी प्रवेश/१२ एचएस, दि.३.६.२०११

वरील विषयासंबंधी आपल्या संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) सी.बी.एस.ई.बोर्डाच्या ज्या विद्यार्थ्यांनी इ.१० वीची परीक्षा सी.बी.एस.ई बोर्डामार्फत देवून उत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना प्रचलित नियमानुसार राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वीसाठी प्रवेश देण्यात यावा.

२) सी.बी.एस.ई.मंडळाच्या दि.२०.९.२००९, दि.२.८.२०१० व दि.३०.८.२०१० च्या परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सी.बी.एस.ई. बोर्डाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी त्यांच्याच शाळेत पुढील प्रवेश घ्यावा, असे अपेक्षित आहे. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत जसे की- एखाद्या ठिकाणाहून बदली झाली असेल अशा बदलीच्या ठिकाणी सी.बी.एस.ई.बोर्डाची उच्च माध्यमिक शाळा नसेल तर अशा वेळी या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून सी.बी.एस.ई.बोर्डाच्या दि.२०.९.२००९ च्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट-१, D(१) मधील तरतूदीनुसार इतर बोर्डातील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देण्यासाठी बहिस्त परीक्षा[External Examination] सी.बी.एस.ई.बोर्डाकडून उत्तीर्ण होण्याच्या अटीवर बंधपत्राच्या आधारे[Bond] ऑफलाईन पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तद्नंतर सी.बी.एस.ई. बोर्डाकडून बहिस्त परीक्षेचा निकाल घोषित करण्यात आल्याच्या आधारावर त्यांचे इ.११ वीतील तात्पुरत्या स्वरुपाचे प्रवेश अंतिम करण्यात यावेत.

२. वरील संदर्भातील सूचना आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

सं.पु. (१५-६-११)
(सं.पु.खोरगडे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

P.T.O.

D:\Sujata\Umashi-1\2011273.lwp